# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड

जिल्हा न्यायालय परिसर, बीड – 431122

जाहिरात प्रसिध्द दिनांक – 06/10/2026

अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख – 12/10/2026

बीड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण करिता खालील पद निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात 11 महिने करिता कंत्राटी तत्वावर भरावयाचे आहे.

**पदाचे नाव व पात्रता**

| अ..क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | शैक्षणिक पात्रता कमीत कमी | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|
| 1 | वाहनचालक (कंत्राटी) | 01 | 1. उमेदवार किमान 12 वी पास असावा.<br>2. उमेदवाराकडे जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकास मोटार वाहन अधिनियम 1988 प्रमाणे वैध व कार्यरत असा किमान हलके मोटार वाहन (LMV) चालविण्याचा परवाना असावा.<br>3. कामाचा अनुभव – चारचाकी वाहन चालविण्याचा अनुभव असलेबाबतचे प्रमाणपत्र असल्यास प्राधान्य. | 17000/– रूपये प्रतिमहिना |

**<u>अटी व शर्ती</u>**

1. सदरचे पद हे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाचे असून फक्त 11 महिने या कालावधीसाठी कंत्राटी स्वरूपात भरण्यात येणार आहे. उमेदवाराचा या पदावर नोकरी कायम करणेबाबत कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही.
2. अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज, घोषणापत्र, हमीपत्र व शैक्षणिक कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रतीसह सिलबंद लिफाफामध्ये अर्जावर लिफाफावर वाहनचालक या पदाकरिता अर्ज असे स्पष्टपणे नमूद करून सुटीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेमध्ये दिनांक 12/10/2026 रोजी सायंकाळी 5–30 पर्यंत **<u>हस्तपोहोच स्वीकारण्यात येतील.</u>** त्यानंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

**<u>अर्ज दाखल करण्याचा पत्ता</u>**

**मा.सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड**

**जिल्हा न्यायालय परिसर, नगर रोड, बीड–431122**

3. अर्जदार हा बीड जिल्हयातील रहिवासी असावा.
4. अर्जदाराचे वय जाहिरात प्रसिध्द झाल्या तारखेपावेतो 21 वर्षापेक्षा कमी आणि 38 वर्षापेक्षा जास्त नसावे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग किंवा महाराष्ट्र शासनाव्दारे 28/03/2018 रोजी त्या वेळेपुरत्या विर्निदिष्ट केलेल्या मागास प्रवर्गाकरिता 43 वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा.
5. वाहन चालविण्याचा अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.
6. निवड करणेत आलेल्या उमेदवाराने प्राधिकरणास करारनामा लिहून दयावयाचा आहे.
7. नेमणुकीनंतर उमेदवारास कोणतेही कारण न देता व कोणतीही पूर्व सूचना न देता नोकरीतून कमी करण्याचा अधिकार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांना राहील.

8. उमेदवारास नेमणूकीच्या कालावधीपूर्वी नोकरी सोडावयाची असल्यास दोन महिन्याची आगाउ सूचना किंवा एक महिन्याचे मानधन या प्राधिकरणाकडे जमा करावे लागेल.

9. उमेदवार हा निर्व्यसनी असावा. उमेदवार व्यसन करत असल्याचे निदर्शनास आल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची कंत्राटी सेवा तात्काळ समाप्त करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.

10. पात्र उमेदवारांची यादी तसेच परिक्षेचे वेळापत्रक जिल्हा न्यायालय, बीड यांच्या अधिकृत संकेतस्थळ **https://districts.ecourts.gov.in/beed** वर तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांच्या सूचना फलकावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.

स्थळ– बीड

08/10/26.

सचिव
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड

# <u>अर्जाचा नमुना</u>

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड करिता निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात ११ महिने या कालावधीकरीता वाहनचालक (Driver) या पदासाठी अर्ज करण्याचा नमुना

नुकताच काढलेला पासपोर्ट साईज फोटो

१. अर्जदाराचे संपुर्ण नाव :— ________________________________________

२. अर्जदाराचे संपुर्ण पत्ता :— ________________________________________

३. अर्जदाराचे जाहिराती दिवशीचे ________________________________________

वय / जन्मतारीख :— ________________________________________

४. आधार कार्ड क्र. :— ________________________________________

५. मोबाईल क्र. व ________________________________________

ई—मेल आयडी :— ________________________________________

६. मोटार वाहन चालविण्याचा ________________________________________

परवाना क्र. :—

७. परवान्याच्या वैधतेची तारीख :— ________________________________________

८. शैक्षणिक अर्हता :—

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | बोर्ड / विद्यापीठ | उत्तीर्ण वर्ष | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

९. अनुभव :—

..................................................................................................................................

..................................................................................................................................

..................................................................................................................................

१०. सोबत कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित केलेल्या प्रती जोडणे आवश्यक आहे.

स्थळ : ..............................................

दिनांक : अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

# घोषणापत्र

मी ..............................................................................................., वय–................वर्षे, रा. ..............................................................................................................., याद्वारे घोषित करतो/करते की, या अर्जामध्ये दिलेली सर्व माहिती माझ्या माहितीनुसार व विश्वासानुसार खरी, पुर्ण व अचुक आहे. जर कोणतीही माहिती कोणत्याही टप्प्यावर खोटी किंवा चुकीची आढळल्यास माझी नियुक्ती रद्द करण्यात येऊ शकते. मी हे ही घोषित करतो/करते की, माझ्यावर कोणत्याही न्यायालयात किंवा प्राधिकरणाकडे कोणतीही शिस्तभंगाची कारवाई झालेली नाही. मी प्रामाणिकपणे, निष्ठेने व शिस्तबद्धपणे काम करण्याचे आश्वासन देतो.

स्थळ :                                                                 ................................

दिनांक :                                                               अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

# हमीपत्र

मी ..............................................................................................., वय–................वर्षे, रा. ..............................................................................................................., वाहनचालक पदासाठी अर्जदार, खालीलप्रमाणे विधिवत हमी देतो की,

१. माझ्याविरूद्ध कोणत्याही न्यायालयात कोणताही फौजदारी गुन्हा प्रलंबित नाही. तसेच मला कोणत्याही फौजदारी गुन्हयात दोषी ठरविण्यात आलेले नाही.

२. मी माझे वाहन चालविताना सर्व वाहतुक नियमांचे पालन करीन आणि सुरक्षित, जबाबदारीने वाहन चालवीन.

३. मी माझ्या वरिष्ठांच्या आदेशांचे पालन करीन आणि मला सोपविलेल्या कामांची प्रामाणिकपणे व वेळेत पूर्तता करीन.

४. मी कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन, मद्यपान करून वाहन चालविणे किंवा शासकीय नियमांचे उल्लंघन करणार नाही.

५. मला दिलेल्या वाहनाची योग्य काळजी घेईन व त्याची नियमित देखभाल करीन.

स्थळ :                                                                 ................................

दिनांक :                                                               अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी